# बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी ) अहिल्यानगर पश्चिम
# अंतर्गत अंगणवाडी मदतनीस रिक्त पदे भरती
# जाहिरात सुचना

महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक-एबावि-2022 /प्र.क्र.94/ का-6 दिनांक 30 जानेवारी 2025 नुसार एकात्मिक बाल विकास सेवा योजना बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) अहिल्यानगर पश्चिम या कार्यालय अंतर्गत येणाऱ्या **श्रीरामपुर** नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्रातील **एकुण** 03 अंगणवाडी मदतनीस रिक्त पदे सरळ नियुक्तीने (By Nomination) भरण्यासाठी पात्र स्थानिक रहिवासी असलेल्या महिला उमेदवारांकडुन दिनांक **– 06/07/2026** विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे.

अंगणवाडी मदतनीस या मानधनी पदाच्या सरळ नियुक्ती संदर्भात पद भरतीची सुचना व विहित अर्ज नमुना, आवश्यक शैक्षणिक पात्रता, अटी व शर्ती https://ahilyanagar.maharashtra.gov.in/ या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. सदर संकेत स्थळावरुन अंगणवाडी मदतनीस भरतीसाठीचा अर्जाचा नमुना डाऊनलोड करुन घेऊन अर्ज परिपुर्ण भरुन सर्व कागदपत्रांसह बंद लिफाफ्यात बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी ) अहिल्यानगर पश्चिम, वेदांत कॉलनी, पहिला मजला,बागरोजा हडको,जूने डॉ.साताळकर हॉस्पीटल जवळ, दिल्ली गेट अहिल्यानगर पश्चिम 414001 या कार्यालयाच्या पत्यावर कार्यालयीन वेळेत समक्ष किंवा पोस्टाने विहीत मुदतीत सादर करावा.उशिरा प्राप्त अर्जाची नोंद घेतली जाणार नाही.

स्वा/-
बाल विकास प्रकल्प अधिकारी
(नागरी) अहिल्यानगर पश्चिम

बाल विकास प्रकल्प अधिकारी (ना) अहिल्यानगर पश्चिम
सत्यमेव जयते

# अंगणवाडी मदतनिस रिक्त पदांची भरती (रिक्त पदे-०३)

## प्रकल्पाचे नांव :- बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी अहिल्यानगर पश्चिम

श्रीरामपुर नगरपालिका क्षेत्रातील अंगणवाडी मदतनीस रिक्त पदासाठी नियमानुसार एकत्रित मानधनी तत्वावर निवडीसाठी सरळ नियुक्तीने (By Nomination) भरण्यासाठी श्रीरामपुर नगरपालिका क्षेत्रातील पात्र महिला उमेदवारांकडून खालील अटी व शर्तीनुसार विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अटी व शर्ती :**

1. अर्ज स्वहस्ताक्षरात भरलेला असावा त्यात खाडाखोड नसावी. मागविलेल्या कागदपत्रांशिवाय इतर कागदपत्रे जोडू नये.
2. **शैक्षणिक पात्रता:** अंगणवाडी सेविका व मदतनिस पदासाठी अर्जदार किमान 12 वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. इ. 12 वीचे गुणपत्रकाची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक असुन सदरील गुणपत्रक आवश्यक राहील. 12 वी व त्यापुढील शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवाराने अर्जात दर्शविलेल्या आवश्यक शैक्षणिक कागदपत्राच्या छायांकित प्रती सांक्षाकित करुन अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.अन्यथा गुण देय होणार नाही.
3. **वास्तव्याची अट:**-उमेदवार महिला स्थानिक रहिवासी असावी. स्थानिक रहिवाशी म्हणजेच ज्या शहरातील अंगणवाडी मदतनीस पदासाठी अर्ज केलेला असेल त्याच शहरातील रहिवाशी महिला अर्जदार असणे आवश्यक आहे. यासाठी रहिवाशी दाखला म्हणुन शासकिय दस्ताऐवज (जसे रेशनकार्ड/मतदान कार्ड/वीज देयक/दूरध्वनी देयक/घरपट्टी/आधारकार्ड इ. ) जोडणे आवश्यक आहे.
4. **वयाची अट:**- अंगणवाडी मदतनिस या पदासाठी वयोमर्यादा किमान 18 वर्षे व कमाल 35 वर्षे राहिल. तसेच विधवा उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा 40 वर्षे राहिल. त्याकरीता शाळा सोडल्याचा दाखला किंवा 12 वी उत्तीर्ण बोर्डाचे प्रमाणपत्र किंवा जन्मदाखल्याची सत्यप्रत जोडणे आवश्यक राहिल. उमेदवाराचे किमान व कमाल वय अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास गणण्यात येईल.
5. **लहान कुटुंब:**- लहान कुटुंबाकरिता दि.27/02/2024 चा शा.निर्णय लागू राहील.वरील पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांस लहान कुटुंबाची अट लागु राहिल. उमेदवारांस दोन पेक्षा जास्त हयात अपत्ये (दत्तक दिलेल्या अपत्यांसह) नसावीत. अर्जासोबत दिलेल्या नमुन्यात लहान कुटुंबाबतचे प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक राहिल. अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.
6. **भाषेचे ज्ञान:**- रिक्त पदांचा तपशिल दर्शविणाऱ्या तक्ता अ मधील सर्व अंगणवाडी मदतनिस रिक्त पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांस मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. इ. 10 वी अथवा त्यापुढील शेक्षणिक अर्हतेपैकी किमान एक अर्हता मराठी भाषा विषयासह उत्त्तीर्ण असणे आवश्यक राहिल.अन्यथा गुण देय होणार नाही.
7. **उमेदवार विधवा असल्यास** :-सक्षम प्राधिकाऱ्याचे पतीचे मृत्यु प्रमाणपत्र जोडावे.तसेच विधवा असलेबाबत स्वघोषणापत्र नमुना जोडावे
8. **उमेदवार अनाथ असल्यास** :- संबंधित विभागीय उप-आयुक्त, महिला व बाल विकास विभाग यांचे प्रमाणपत्र जोडावे.
9. अनुसुचित जाती/ अनुसुचित जमाती/ इतर मागास प्रवर्ग/ विमुक्त जाती/ भटक्या जमाती/ आर्थिक दृष्टया दुर्बल घटक/ विशेष मागास प्रवर्ग/ सामाजिक व शैक्षणीक दृष्टया मागास वर्ग - सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या जातीच्या / प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीसह अर्ज करावा.
10. **अनुभव** :- उमेदवारास एकात्मिक बाल विकास सेवा योजनेची अंगणवाडी सेविका/मिनी अंगणवाडी सेविका/ अंगणवाडी मदतनीस म्हणुन कामाचा किमान दोन वर्षाचा अनुभव असल्याशिवाय अनुभवासाठी असलेले गुण देण्यात येणार नाहीत. असा अनुभव उमेदवारांस असल्यास त्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्याचे अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. मान्यता प्राप्त खाजगी व स्वयंसेवी, अनुदानित संस्थेतील कामाचा अनुभव ग्राह्य धरला जाणार नाही व याबाबतचा कोणताही युक्तीवाद उमेदवाराने केल्यास अपात्र ठरविण्यात येईल.
11. मदतनीस या पदांसाठी जाहिरातीत दिलेल्या नमुन्यात स्वतंत्र अर्ज करणे बंधनकारक आहे. विहीत नमुन्यातील अर्ज सादर करताना प्रकल्पातील ज्या नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्रातील या रिक्तपदासाठी अर्ज केला आहे त्याचा स्पष्ट उल्लेख अर्जात करणे आवश्यक आहे.
12. एका उमेदवाराने एका पदासाठी एकच अर्ज सादर करावा. उमेदवाराने एकापेक्षा जास्त केंद्राच्या पदांसाठी वेगवेगळे अर्ज सादर केल्यास एकच अर्ज विचारात घेण्यात येईल. त्याबाबत उमेदवाराशी कोणताही पत्रव्यवहार केला जोणार नाही.
13. अर्जासोबत जन्मतारखेचा पुरावा, शैक्षणिक पात्रतेबाबत गुणपत्रक व प्रमाणपत्र (दहावी, बारावी, पदवुत्तर, डी एड, बी एड, MS-CIT इ.) जातीचे प्रमाणपत्र (स्वत:चे नावाचे), अनुभव प्रमाणपत्र, विधवा (अटी व शर्तीमधील क्र. 6 नुसार दाखला), अनाथ महिला असल्यास (अटी व शर्तीमधील क्र. 7 नुसार दाखला) इ. च्या सक्षम प्राधिकाऱ्याकडुन साक्षांकित केलेल्या प्रती जोडणे आवश्यक आहे. **सदरचे सर्व आवश्यक कागदपत्र जोडले नसल्यास अगर साक्षांकित नसल्यास याबावतचे गुण दिले जाणार नाहीत**, याची नोंद घ्यावी.अर्जासोबत प्रमाणपत्राच्या सर्व सांक्षाकित प्रती जोडाव्यात आवश्यकतेनुसार खात्रीकरिता मुळ प्रमाणपत्रे मागविण्यात येईल.
14. अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक नंतर कोणत्याही प्रकारचे कागदपत्र स्विकारले जाणार नाही.
15. अर्जात शहराचे नाव व पदाचे नाव नमुद केलेले नसणे,जाहिरातील नमुद पदां अर्ज करणे अर्ज अपुर्ण भरलेला असणे, खाडाखोड असणे, उमेदवाराची विहीत ठिकाणी स्वाक्षरी नसणे तसेच अर्जाच्या सोबत सर्व आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या छायांकित व साक्षांकित प्रती नसणे इ. कारणांमुळे अर्ज अपात्र ठरविण्यात येतील व त्यासंबंधी उमेदवारांस कळविण्यात येणार नाही.
16. अंतिम दिनांकानंतर कार्यालयात अर्ज स्विकारले जाणार नाही. अंतिम दिनांकानंतर आलेल्या किंवा डाकेने (पोष्टामुळे) विलंब झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
17. निवड कार्यपध्दती :- महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निग्रय क्र.एबावि-2022/प्र.क्र.94/का-6, दिनांक 02.02.2023 महिला व बाल विकास विभाग, शासन निग्रय क्र.एबावि-2022/प्र.क्र.94/का-6, दिनांक 02/05/2023, दिनांक
18. 11/08/2023 व दिनांक 27/02/2024 व महिला व बाल विकास विभाग शा.नि.क्रं एबावि-2022/प्.क्रं. 94/का-6/ दि.30/01/2025 नुसार तसेच त्या पुढील सुधारित सुचनानुसार उमेदवारांनी अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांवरुन इयत्ता 10 वी/12वी/पदवी/पदव्युत्तर/पदविका /डिएड/बीएड/संगणक अर्हता उत्तीर्ण प्रमाणपत्र यामध्ये त्यांना मिळालेलया गुणांनुसार तसेच विधवा/अनाथ, जात प्रवर्ग, अनुभव इ. साठी त्यांचे प्रमाणपत्रांवरुन मिळालेल्या एकुण गुणांनुसार गुणाक्रमांने पात्र उमेदवारांची शहरातील रिक्त पदांच्या संख्यानुसार निवड करण्यात येईल. या पदांकरीता लेखी परीक्षा अथवा मुलाखत घेतली जाणार नाही. अर्जा सोबत जोडलेल्या प्रमाणपत्रांनुसार शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे उमेदवारांना गुण देऊन प्राथमिक गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल. त्यावर अर्ज करणाऱ्या उमेदवारांना आक्षेप/तक्रार असल्यास अर्ज

केलेल्या उमेदवारांनी 10 दिवसांचे आत लेखी तक्रार बाल विकास प्रकल्प अधिकारी(नागरी ) अहमदनगर पश्चिम कार्यालयाकडे सादर करावी. सदर तक्रारींची शहानिशा करुन अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल.

19. अंतिम निवड झालेल्या उमेदवारानांच निकालाबाबत कळविण्यात येईल. इतर उमेदवारांना कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

20. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व /किंवा अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी /नियुक्ती सदर प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर किंवा निवड झाल्यानंतरही रद्द करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांच्या नियुक्ती वेळी मुळ कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहिल. अन्यथा निवड प्रक्रियेतुन अपात्र ठरविण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांना सर्व अट व शर्ती मान्य असल्याचे रु. 100/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन देणे बंधनकारक राहिल.

21. एखाद्या उमदेवाराने त्याच्या निवडीसाठी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यांस निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.

22. अंगणवाडी सेविका व मदतनिस यांना शासन दरानुसार दरमहा मानधन देय आहे. शासकिय नियमानुसार एकत्रित मानधनात वेळोवेळी करण्यात आलेली वाढ नियमानुसार अनुज्ञेय राहिल. मात्र मानधना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते सवलती अनुज्ञेय नाही.

23. अंगणवाडी सेविका व मदतनिस हे एकत्रित मानधनावरील मानधनी स्वरुपाचे पद आहे. मानधना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारची भत्ते व सवलती अनुज्ञेय नाही. सदर पद बढती/बदली/सेवानिवृत्ती/वेतनवाढ इ. शासकिय सवलतीस पात्र नाही.

24. संबंधित शहरातील अंतिम निवड यादी जाहिर झाल्यांनतर गुणानुक्रमे सेविका व मदतनिस यांची निवड करण्यात येईल. व गुणानुक्रमानुसार अंगणवाडी केंद्र देण्यात येईल. त्यामुळे निवड झालेल्या उमेदवारांना त्या-त्या शहरातील कोणत्याही अंगणवाडी केंद्रावर काम करावे लागेल. उमेदवाराची एकदा नियुक्ती झाल्यावर कोणत्याही परिस्थितीत त्यांची इतर ठिकाणी बदली करता येणार नाही. तसेच त्यांचे निवासस्थानापासुन नियुक्ती देण्यात आलेल्या ठिकाणापर्यंत कोणताही प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही. त्याचप्रमाणे नियुक्ती झालेल्या ठिकाणी सतत गैरहजर राहिल्यास त्यांची नियुक्ती खंडीत करणेत येईल. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपूर्वी विहीत नमुन्यात करारनामा करुन देणे बंधनकारक राहिल.

25. प्रतिक्षा यादी:- एकुण प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारावर उमेदवारांची प्रतिक्षा यादी ठेवण्यात येईल. काही कारणामुळे उमेदवार नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन 30 दिवसांत रुजु न झाल्यास किंवा त्यांस अपात्र ठरविण्यात आल्यास प्रतिक्षा यादीतील गुणानुक्रमानुसार पुढील उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल व सदर क्षेत्रात कोणत्याही कारणास्तव पद रिक्त झाल्यास अथवा नविन पद निर्मीती झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांस गुणागुक्रमे नियुक्ती देण्यात येईल. सदर प्रतिक्षा यादी निकाल जाहीर झाल्यापासुन एक वर्ष वैध राहिल.

26. अपिल:- मदतनिस या पदावरील घोषित निवडी संदर्भात कोणत्याही उमेदवाराची तक्रार असल्यास निवड यादी घोषित झाल्यापासुन 30 दिवसांची आंत विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे तक्रार करावी व मा. विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास, नाशिक विभाग, नाशिक यांनी दिलेल्या निर्णयामुळे तक्रारदारचे समाधान झाले नसल्यास मा. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचेकडे पुढील 60 दिवसांत अपिल दाखल करता येईल.

27. सेवा समाप्तीसाठी वयाची अट या शासन निर्णयान्वये नियुक्त होणाऱ्या अंगणवाडी मदतनिस यांची सेवा वयाची 60 वर्षे पुर्ण होईपर्यंत किंवा त्या शारीरिक दृष्ट्या काम करण्यास सक्षम नसल्यास यापैकी जे आधी घडेल तोपर्यंतच सुरु ठेवण्यात येईल.

28. जाहिरातीमधील कोणत्याही मुद्याबाबत साशंकता अगर संदिग्धता निर्माण झाल्यास संबंधित शासन निर्णयातील तरतुदी तसेच वरिष्ठ कार्यालयाचे आदेश अंतिम राहतील.तसेच प्रकल्पातील अंगणवाडी मदतनीस पदाच्या रिक्त पदांमध्ये कमी जास्त बदल करण्याचे तसेच अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे अधिकार या कार्यालयाने स्वत:कडे राखुन ठेवले आहे.

29. पत्रव्यवहार: भरती प्रक्रियेसंबंधी अर्जदारांस कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. सर्व सूचना जाहिरातीमधील अटी व शर्तीप्रमाणे असुन वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सुचना कार्यालयीन नोटीस बोर्डावर लावण्यात येतील.

**30.** **महत्वाची सुचना** सदर भरती प्रकिया शा.निर्णय दि.02/02/2023 व दि.30/01/2025 अन्वये राबविण्यात येणार असून नियुक्ती गुणवत्ता यादीनुसार करण्यात येणार आहे.करिता उमेदवारांनी कोणत्याही भुलथापाना व अफवाना बळी पडू नये.

**31. अर्ज सादर करण्याचा पत्ता - बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी अहिल्यानगर पश्चिम, वेदांत कॉलनी, पहिला मजला, जुने डॉ.साताळकर हॉस्पीटल शेजारी, बागरोजा हडको, दिल्ली गेट, अहिल्यानगर** 4140001

**32.** अर्ज स्विकारण्याचा कालावधी :- दि. **06/07/2026 पासुन** दि. 17/06/2026 **पर्यंत शासकीय सुटटी दिवस वगळून**

**बाल विकास प्रकल्प अधिकारी**
**नागरी अहिल्यानगर पश्चिम**

# अंगणवाडी मदतनीस पदासाठी अर्जाचा विहित नमुना

उमेदवाराचा अलिकडील काळातील काढलेला रंगीत फोटो

**प्रति,**

**मा.बाल विकास प्रकल्प अधिकारी**

**नागरी अहिल्यानगर पश्चिम.**

**विषय** :-अंगणवाडी मदतनीस पदासाठी अर्ज

संदर्भ :- अंगणवाडी मदतनीस पदासाठी जाहिरात दि.-----------

मी कु./श्रीमती --------------------------------------------------------खाली सही करणार -------------------------- या शहरातील रहिवाशी असून मी आपल्या प्रकल्पातील रिक्त अंगणवाडी मदतनीस या पदासाठी अर्ज सादर करीत आहे. त्यासाठी माझी माहिती खालीलप्रमाणे-

१.अर्जदाराचे नाव (विवाहापुर्वीचे नाव) ------------------------------------------------------------------------------------

२.विवाहानंतरचे नाव :------------------------------------------------------------------------------------

३.संपूर्ण पत्ता :- ------------------------------------------------------------------------------------

४.मोबाईल क्रमांक : -

५.जन्मतारीख :-

६.अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकास असलेले वय -------- -वर्षे----------- -महिने--------- -दिवस

७. धर्म ---------------------- जात/पोटजात -------------------------------------- प्रवर्ग --------------------

८.मागासवर्गीय आहे का ? होय / नाही (असल्यास प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडावी)

| प्रवर्ग | अनुसुचित जाती | अनुसुचित जमाती | इतर मागास प्रवर्ग | विमुक्त जाती | भटक्या जमाती | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक | विशेष मागास प्रवर्ग | सामाजिक व शैक्षणीक दृष्टया मागास वर्ग | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| होय /नाही | | | | | | | | | |

९. उमेदवार स्थानिक रहिवासी आहे काय ? होय / नाही (रहिवासी पुरावा जोडावा)

१०.हयात असलेल्या अपत्यांची संख्या मुले------------ मुली---------- एकुण अपत्ये----------

११.विवाहीत/अविवाहित ------------------------------------------------------------------------------------

१२.विधवा आहे काय ? होय / नाही

१३.अनाथ आहे काय ? होय / नाही

14.मराठी भाषेचे ज्ञान आहे काय ? होय / नाही इ.१० वी प्रमाणपत्र जोडावे

१५.शैक्षणिक अर्हता - किमान १२ वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. /एकापेक्षा जास्त प्रयत्नात उत्तीर्ण झाल्यास एकत्रित गुण द्यावे

| अ.क्र. | शिक्षण | उत्तीर्ण वर्ष | संस्थेचे /शाळेचे/बोर्डाचे/विद्यापीठाचे नाव | प्राप्त गुण /एकुण गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | इयत्ता बारावी | | | | |
| २ | पदवी | | | | |
| ३ | पदव्युत्तर पदवी | | | | |
| ४ | डि.एड | | | | |
| ५ | बी. एड | | | | |
| ६ | संगणक प्रमाणपत्र MS-CIT / समकक्ष | | | | |
| ७ | इतर | | | | |

१६. शासकिय अंगणवाडी सेविका/अंगणवाडी मदतनिस/मिनी अंगणवांडी सेविका या पदाचा अनुभव असल्यास नियुक्ती आदेश व प्रमाणपत्र अनुभव जोडावे.

| अंगणवाडीचे नांव व पत्ता प्रकल्प | पद | कालावधी (पासुन - पर्यंत) |
|---|---|---|
| | | |

कृ.मा.पहा

| **अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे:- (सत्यप्रतीत जोडणे आवश्यक )** | **होय /नाही** |
|---|---|
| विहीत नमु-यातील व स्वहस्ताक्षरातील फोटो लावलेला अर्ज /ओळखीचा पुरावा आधार कार्ड | |
| रहिवाशी पुरावा - रेशनकार्ड/मतदान कार्ड/वीज देयक/दूरध्वरी देयक/घरपट्टी इ. पैकी कोणतेही एक) तसेच प्रतिज्ञापत्र जोडावे | |
| शैक्षणिक पात्रतेचे कागदपत्रे<br>इयत्ता १० वीचे गुणपत्रक व प्रमाणपत्र | |
| इयत्ता १२ वीचे गुणपत्रक व प्रमाणपत्र | |
| पदवीचे गुणपत्रक व प्रमाणपत्र | |
| पदव्युत्तर पदवीचे गुणपत्रक व प्रमाणपत्र | |
| डिएड चे गुणपत्रक व प्रमाणपत्र | |
| बीएडचे गुणपत्रक व प्रमाणपत्र | |
| MS-CIT प्रमाणपत्र अथवा शासनाने वेळोवेळी ठरविलेला संगणक अभ्यासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र असल्यास | |
| वयाचा पुरावा- नगरपालिका/महानगरपालिका/ग्रामपंचायतीचा जन्म दाखला / १० चे बोर्ड सर्टिफिकेट / जन्म दिनांक नमुद असलेला शाळा/महाविदयालय सोडल्याचा दाखला | |
| विधवा असल्यास विवाह दाखला, पतीचा मृत्युप्रमाणपत्र, पुर्नविवाह न केल्याचे प्रतिज्ञापत्र | |
| अनाथ असल्यास अनाथ प्रमाणपत्र | |
| प्रवर्ग/जात प्रमाणपत्र /जातीचा दाखला (लागु असल्यास) अ.जा/अ.ज/इ.मा प्र/वि.जा/भ.ज/ आर्थिकदृष्टया दुर्बल घटक/विशेष मागास प्रवर्ग/सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास वर्ग | |
| अंगणवाडी सेविका / अंगणवाडी मदतनीस/मिनीअंगणवाडी सेविका म्हणून कमीत कमी २ वर्षाचा अनुभव असणा-या अनुभवाचा दाखला (असल्यास) व नियुक्ती आदेश | |
| लहान कुटुंब प्रतिज्ञापत्र | |

**वरिलपैकी ज्या कागदपत्रांच्या स्वाक्षरीत सत्यप्रती अर्जासोबत सादर केल्या आहेत त्या समोरील चौकटीत होय लिहावे.**

वरीलप्रमाणे दिलेली माहिती खरी असुन अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रानुसार माझी माहिती खोटी/चुकीची आढळल्यास माझा अर्ज बाद करण्यात येईल किंवा माझी निवड/नियुक्ती झाल्यानंतरही माझी नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल व त्यास माझी काहीही हरकत नसेल व नियमानुसार कारवाईस मी पात्र ठरेल याची मला पुर्ण जाणीव आहे तसेच जाहिरीतीमधील नमुद अटी व शर्ती मी पूर्णपणे वाचलेल्या असून त्या सर्व मला मान्य आहेत.

ठिकाण:- उमेदवाराचे नांव -------------------------------

**दिनांक:-** स्वाक्षरी -------------------------------

## लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र

मी,श्रीमती. ---------------------------------------------------------------------------------श्री.------------------------------------------------- यांचा /यांची मुलगा /मुलगी / पत्नी, वय------------ वर्षे राहणार------------------------------------------------------------------या द्वारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करते की

(१) मी --------------------------------------या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला खालीलप्रमाणे अपत्ये (मुले/मुली) आहेत.

| अं. | अपत्य (मुलाचे/मुलीचे)नांव | जन्मतारीख | वय |
|---|---|---|---|
| ४. | | | |
| ५. | | | |
| ६. | | | |

(३) हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल, किंवा भविष्यात दोनापेक्षा अधिक अपत्य झाल्यास, मानधनी पदासाठी मी अपात्र ठरविण्यास किंवा कामावरुन कमी करण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण:- उमेदवाराचे नांव -------------------------------

**दिनांक:-** स्वाक्षरी -------------------------------

## विधवा असल्याबाबतचे घोषणापत्र

मी,श्रीमती. -----------------------------------------------------------------श्री.--------------------------------------------यांची मुलगी वय------ ------- वर्षे व्यवसाय ---------------------------- राहणार --------------------------------- आधारकार्ड क्रं.---------------------- या द्वारे घोषीत करते की,मी राहणार ---------------------- ता.----------------- जि.-------------------- येथिल रहिवासी असून माझे पती कै.------------------------------- -------------------------- हे मयत असून मी विधवा आहे.तसेच पुर्नविवाह केलेला केलेला नाही.

तसेच मी याद्वारे घोषीत करते की,वरिल सर्व माहिती माझ्या व्यक्तिगत माहिती व समजूतीनुसार खरी आहे.सदर माहिती खोटी आढळून आल्यास भारतीय दंड संहिता अन्वये आणि किंवा संबधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन.तसेच सदर स्वंयघोषणापत्राद्वारे मला मिळालेले सर्व लाभ सर्वकषरित्या काढून घेण्यास येतील याची पुर्ण जाणीव आहे.

ठिकाण:- उमेदवाराचे नांव -------------------------------

**दिनांक -** स्वाक्षरी -------------------------------